**प्रेस नोट** **दिनांक १०/०४/२०१९**

## शिवाजीनगर पोलीस ठाणे पुणे शहर

## दोन अल्पवयीन मुलींस त्याचे नातेवाईकांच्या ताब्यात दिले

दि.०९/०४/२०१९ रोजी पोलीस उप निरीक्षक श्री दर्शन शिंदे हे पोलीस ठाणेचे हद्दीमध्ये रात्रगस्ती करत असताना नियंत्रण कक्ष पुणे शहर यांनी पोउपनिरी दर्शन शिंदे यांना तात्काळ केईएम हॉस्पीटल येथे जाण्यास सांगितल्याने पोउपनिरी शिंदे व स्टाफ असे केईएम हॉस्पीटल येथे गेल्यानंतर तेथे दोन अल्पवयीन मुली,वय १५ वर्षे रा.सोलापुर येथुन घरी कोणास काहीएक न सांगता पुणे येथे आल्याचे निदर्शनास आल्याने,सदर मुलींकडे विश्वासात घेवुन त्यांचे पालकांचे बाबत विचारणा करुन त्यांचे मोबाईल फोन क्रमांक प्राप्त केले व सदर क्रमांकावर संपर्क साधुन दोन्ही अल्पवयीन मुली या पुणे येथे सुखरुप असल्याचे कळविले.

दि.०९/०४/२०१९ रोजी सकाळी मुलगी नामे बागडे हिची मोठी बहिण हिचे वडिल हे पोलीस ठाणे येथे हजर झाल्यानंतर सदरबाबत खात्री करुन मुलींचे पालकांचे जबाब नोंद करुन त्यांनी कोणाविरुध्द काहीएक तक्रार नसल्याचे सांगितल्याने मिळुन आले्ल्या अल्पवयीन मुली यांना पालकांच्या ताब्यात देण्यात आलेले आहे.

वरील नमुद कामगिरी ही बाळासाहेब कोपनर वरिष्ठ पोलीस निरीक्षक शिवाजीनगर पो स्टे पुणे शहर, श्री बापु शिंदे पो नि गुन्हे शिवाजीनगर पो स्टे पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक दर्शन शिंदे,मपोना सुतार, यानी केलेली आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक
शिवाजीनगर पोलीस ठाणे पुणे शहर